# महाराष्ट्राच्या सामाजिक विचारातील संतांचे योगदान

**मुरलीधर बाबाराव हंबर्डे**
संशोधक विद्यार्थी

**प्रास्ताविक**

सामाजिक विचारांचा इतिहास हा मानवी समाजाइतकाच प्राचीन आहे. मानवी समाजाच्या उत्पत्तीबरोबरच सामाजिक विचारांचीही निर्मिती झालेली दिसून येते. कारण, मानवी संस्कृती आणि जीवनाच्या कोणत्याही टप्प्यात माणूस हा सामाजिक प्रश्न व सांसारिक चिंता यापासून मुक्त नव्हता. दैनंदिन सामाजिक जीवन जगत असताना मानवाला अनेक समस्या किंवा प्रश्नाला तोंड द्यावे लागत होते. या समस्यांची किंवा प्रश्नाची जेव्हा तो सोडवणूक करण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा सामाजिक विचारांची जडणघडण होत गेली. याशिवाय जेव्हा मानव आजूबाजूच्या नैसर्गिक परिसरावर मानवामानवाच्या जीवनातील गुंतागुंतीच्या बाबीवर विचार करतो, तेव्हा त्यातूनही सामाजिक विचार आकार घेत असतो. याबाबतीत प्रा.आर.एन.मुखर्जी म्हणतात की, मानवामानवाचे संबंध विविध समस्या ह्या या-ना-त्या स्वरूपात पूर्वीही अस्तित्वात होत्या आणि जोपर्यंत मानवी समाज आहे, तोपर्यंत राहणार आहेत. या दृष्टीने विचार करता सामाजिक विचाराचा उगम मानवी समाजाच्या निर्मितीबरोबरच झाला व मानवी समाजाच्या अंताबरोबरच सामाजिक विचारांचाही अंत होईल. म्हणजेच, मनुष्य समाजशील प्राणी आहे. या समाजजीवनात वावरत असताना मानवामानवांमध्ये सहसंबंध प्रस्थापित होतात. त्यांच्या अनेक समस्यांही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात असतात. म्हणूनच, सामाजिक विचाराचा उगम मानवी समाजाच्या निर्मितीबरोबर झाला व मानवी समाजाच्या अंताबरोबरच सामाजिक विचाराचा अंत होईल, असे आर.एन.मुखर्जी यांनी म्हटले आहे. त्यांनी व्यक्त केलेले हे विचार संशोधकाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. रॉलिन चॉम्बलिस यांच्या मते, आजच्या युगाची सर्वात मोठी शोकांतिका ही की, आजच्या युगातील बहुसंख्य शिकलेली माणसे भूतकाळ समजून घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु, वर्तमानकाळाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे वर्तमानकाळाचे वास्तविक विश्लेषण करण्यात ही मंडळी पूर्णपणे अपयशी ठरली आहेत. गेल्या अनेक पिढ्यांत व्यक्ती-व्यक्तीत होणाऱ्या आंतरक्रियांच्या स्वरूपामध्ये फार मोठे बदल करण्यात समाजाला यश आले नाही. म्हणूनच, वर्तमानकाळाचे निर्धारण भूतकाळात मानवाने मिळविलेल्या यशावर अवलंबून आहे. समाज हा निर्जीव आणि सजीव या दोन्ही घटकांनी बनलेला असतो. समाजाचा सजीव भाग निर्जीवाच्या साह्याने निर्धारित केला जातो. त्यामुळे निर्जीवाच्या तुलनेत सजीव जीवन हे नाममात्र मानले जाते. समाजाचा निर्जीव घटक हा समाजाच्या संस्कृतीचा, इतिहासाचा, परंपरांचा वारसा सांगतो, म्हणून तो भूतकाळाशी निगडित असतो. तर सजीव घटक हा वर्तमानकाळ आहे. समाजाचा वर्तमानकाळ हा समाजाच्या भूतकाळाशी कोणत्या ना कोणत्या प्रकारे संबंधित असतो. म्हणूनच, सामाजिक विचारांचा अभ्यास ऐतिहासिक पार्श्वभूमीवर करणे आवश्यक ठरते.

**संशोधन विषयाची उद्दीष्ट्येः**

१) सामाजिक विचारांचे महत्व जाणून घेणे.
२) महाराष्ट्रातील संत परंपरेची पार्श्वभूमी जाणून घेणे.
३) महाराष्ट्रातील संत परंपरेचा अभ्यास करणे.

**सामाजिक विचारांचे महत्त्व**

भूपृष्ठावर अनेक संत, महापुरुष, समाजसुधारक काळाच्या ओघात होऊन गेलेले आहेत. जनकल्याणासाठी वेळोवेळी जनतेच्या समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी संत, महापुरुष, समाजसुधारक यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. भविष्यकाळाचा अचूक वेध घेऊन उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संत, महापुरुष, विचारवंत, समाजसुधारक यांचे विचार मार्गदर्शक ठरत असतात. त्यामुळे संत, महापुरुष, समाजसुधारक यांच्या सामाजिक विचारांचे समाजात आदान-प्रदान होणे महत्त्वाचे आहे. सामाजिक विचारांचे महत्त्वाचे काही ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. सामाजिक विचारातून सामाजिक शास्त्रांच्या विकासास साहाय्यता प्राप्त होते.
२. सामाजिक विचारातून समाज सदस्यांना समस्या सोडविण्यासाठी संकेत मिळतात.
३. सामाजिक विचाराच्या आधारावर सिद्धांताची मांडणी करणे शक्य होते.
४. शासन, नियोजनकर्ते यांना धोरण व कार्यक्रमाची रूपरेषा ठरविताना सामाजिक विचार मार्गदर्शक ठरतात.
५. वर्तमानकालीन संस्था, संघटना, समुदाय, मंडळे व अन्य घटकांबाबत पूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी सामाजिक विचार प्रेरणादायी ठरतात.
६. सामाजिक विचारातून संबंधित समाजाचा वारसा सातत्याने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी मदत होते.

थोडक्यात, मानवी जीवन आणि समाजाच्या सुस्थितीसाठी सामाजिक विचाराचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कारण, सामाजिक विचारातून सामाजिक विचारांचा अनन्यसाधारण विकास, सिद्धांताची मांडणी, शासन व नियोजनकर्ते यांना धोरण व कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे आणि सुविचारांचा वसा आणि वारसा जपण्यासाठी सामाजिक विचारांचे समाजजीवनात खूप महत्त्व आहे, असे संशोधकांनी स्पष्ट केले आहे.

**सामाजिक विचारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

अतिप्राचीन सामाजिक विचार हे वचने, म्हणी, लोककथा, दंतकथा या स्वरूपात आढळून येतात. या विचारांनाच 'लोकविचार' देखील म्हणतात. मानव हा मुख्यत्वेकरून निसर्गाच्या सान्निध्यात असल्यामुळे नैसर्गिक घटकांचा तत्कालीन मानवाच्या विचारांवर प्रभाव होणे साहजिकच होते. दैवीशक्तीच्या वा ईश्वरासंबंधीच्या विचारधारा तसेच धर्मासंबंधीचे विचार हे प्राचीन समाजात अपरिपक्व व अस्पष्ट होते. अतिमानवी शक्तीच्या भीतीतून ते विचार निर्माण झाले होते. त्यामुळेच प्राचीन लोकविचारात तत्त्वज्ञानावर आधारित विचारांचा अभाव आढळतो. प्राचीन लोकविचारांचे स्वरूप लक्षात घेता, काही वचने व म्हणी यांच्या माध्यमातून सामाजिक विचारांचे प्रबोधन केले जात होते. जसे की, 'घोडा चोरीला गेल्यावर तबेल्याला कुलूप लावण्यात काहीच अर्थ नाही.' म्हणजेच, निष्काळजीपणाचे परिणाम हे भयंकर होतात म्हणून, निष्काळजीपणा टाळण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. 'बैल मेला झोपा केला.' बैल मेल्यावर त्यासाठी गोठा बांधण्यात काय अर्थ? असा या म्हणीचा अर्थ होतो.८ प्राचीनकाळी वचने किंवा म्हणीच्या माध्यमातून समाजाला उपदेश केला जात होता. या म्हणीच्या माध्यमातून व्यक्तीच्या जवळचा आळशीपणा दूर करून तो आपले कार्य चांगल्या पद्धतीने पार पाडावे, असा त्यांचा उद्देश होता.

**संताचे सामाजिक विचार**

संताचे सामाजिक विचार किंवा कार्य हे सर्व शोषित, पीडित, श्रेष्ठ-कनिष्ठ, लहान-थोर, स्त्री-पुरुष अशा सर्वांसाठीच होते. सामाजिक सुधारणावादी विचारांचा प्रचार व प्रसार समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत झाला पाहिजे, याच हेतूने त्यांनी भजन-कीर्तन, भारूड व अभंगाच्या माध्यमातून

सर्वसामान्याशी हृदयसंवाद साधला. संतांनी त्यांच्या संपूर्ण हयातीत व समाजजीवनामध्ये वावरत असताना कोणत्याही भौतिक सुखविलासाला महत्त्व न देता उदात्त आणि सुंदर समाजोद्धारांचे प्रयोजन डोळयासमोर ठेवून सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. मराठी साहित्याच्या माध्यमातून समाजात सामाजिक विचारांची पेरणी करणाया प्रमुख संतांचा अभ्यास पुढीलप्रमाणे केला आहे.

**संत नामदेव**

मराठी संत साहित्यातील संत नामदेव हे पहिल्या पिढीतील संत आहेत. वारकरी संप्रदायात त्यांचे स्थान फार वरचे आहे. भागवत धर्माचा पाया रचून ज्ञानेश्वरांनी महान कार्य साधले. एवढेच नव्हे, त्याहूनही अधिक महत्कार्य भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करून नामदेवांनी केले. नामदेवांचे कार्य महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. तर महाराष्ट्राच्या बाहेर अगदी उत्तर भारतातील आजच्या पंजाबपर्यंत त्यांनी विठ्ठलभक्तीचा म्हणजेच, वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. नामदेव हे वारकरी संप्रदायाचे आदल प्रचारक म्हणून ओळखले जातात. संत नामदेवांचा जन्म एका शिंपी कुळामध्ये झाला. संत नामदेवांनी आपल्या कुळाचा परिचय अभंगाच्या माध्यमातून करून दिला. ते म्हणतात की,

**शिंपियाचे कुळी जन्म मज झाला।**
**परि हेतु गुंतला सदाशिवी ।।१।।**
**रात्रीमाजि शिवी दिवसामाजि शिवी।**
**आराणूक जीवी नाही माझ्या।।२।।**
**सुई आणि सुतळी कात्री गज दोरा।**
**मांडिला पसारा सदाशिवी।।३।।**
**नामा म्हणे, शिवी विठोबांचे अंगी।**
**त्याचेनि मी जगी धन्य झालो।।४।।**

या अभंगातून संत नामदेवाला असे म्हणावयाचे आहे की, माझा जन्म एका शिंपी कुळात झाला असला तरी मला विठ्ठलांची ओढ आहे. मी रात्रंदिवस शिवणकाम करीत असल्यामुळे मला फारसा वेळ मिळत नाही. माझा प्रमुख व्यवसाय शिंपी असल्यामुळे सुई, दोरा, कात्री, गज या वस्तू माझ्यासाठी विठ्ठलाप्रमाणे एकरूप झाल्या आहेत. संत नामदेवांनी ‘नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी’ या उक्तीप्रमाणे वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला. संत मेळयाची स्थापना करून अठरापगड जातीतील लोकांना एकत्रित केले. महाराष्ट्राबाहेर म्हणजेच, पंजाबपर्यंत वारकरी संप्रदायाची पताका फडकावली. विठ्ठलभक्ती, नामस्मरणाचे धडे दिले. यासोबतच तत्कालीन सामाजिक वास्तवाचे चित्रण त्यांच्या काही अभंगांतून आल्याचे दिसून येते. म्हणून, संत ज्ञानेश्वर समकाळात संत नामदेवाचे कार्य उल्लेखनीय असे आहे, हे संशोधकाने संदर्भासहित स्पष्ट केलेले आहे.

**संत जनाबाई**

संत जनाबाई यांच्या समकालीन परिस्थितीमध्ये जातीयता, वर्णद्वेष, अस्पृश्यता इत्यादींमुळे समाजात विषमतेची दरी वाढलेली होती. तसेच पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे ‘चूल आणि मूल’ एवढ्यापुरतेच मर्यादित झालेले होते. यातच संत जनाबाई स्त्री असल्यामुळे त्यांच्यावर अनेक मर्यादा होत्या. जनाबाईचे आई-वडील लहानपणीच वारल्यामुळे त्या ‘अनाथ’ होत्या. अशा कठीण काळात जीवन जगण्यासाठी त्या संत नामदेव यांच्या घरी दासी म्हणून दैनंदिन कार्य करीत होत्या. समाजातील परिस्थितीचे चित्रण करताना संत जनाबाई म्हणतात की,

**राजाई गोणाई। अखंडित तुझे पायीं।।१।।**
**मज ठेवियेले द्वारीं। नीच म्हणोनि बाहेरी।।२।।**
**नारा गोंदा महादा विठा। ठेवियलें अग्रवटा।।३।।**

**देवा केंव्हा क्षेम देसी। आपुली म्हणोनि जनी दासी।।४।।**

वरील अभंगामध्ये संत जनाबाई आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाचे चित्रण करताना संत नामदेवाला उद्देशून म्हणतात की, गोणाई आणि राजाई यांना स्वतःजवळ ठेवले. मात्र, मी खालच्या जातीतील आहे म्हणून मला घराबाहेर ठेवले. तसेच नारा, महादा, विठा, गोदा यांना नेहमी सन्मानाची वागणूक दिली. परंतु, मी तुमची दासी आहे म्हणून मला केव्हातरी सन्मानाची वागणूक भेटेल का? समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठ भावना, अस्पृश्यता, जातीवरून ठरणारा दर्जा यामध्ये कनिष्ठ जातीचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. याच सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून संत जनाबाईने अभंगाच्या माध्यमातून समाजामधील विषमतेचे चित्रण मुःामहून केले आहे. मध्ययुगात संत जनाबाईने पुरुषांच्या तोडीस-तोड असे समाजजागृतीचे महान कार्य केले. आई-वडिलांविना अनाथ असतानादेखील संत नामदेव यांच्या घरची दासी बनून दैनंदिन प्रपंचावर मात केली. संत नामदेवांच्या तोडीस-तोड सामाजिक सुधारणेशी निगडित अनेक अभंगांची निर्मिती केली. त्यांच्या अभंगातून समाजाला बोध देणारे, दिशा दाखविणारे आणि समाजात सुधारणावादी विचारांची पेरणी करणारे अभंग रचून त्यांचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी त्यांच्या जीवनातील वेदना, व्यथा मांडताना सामाजिक प्रश्नांचा अचूक वेध घेतलेला आहे. संत जनाबाईने स्त्रीपणाला आणि समाजव्यवस्थेच्या बंधनाला झुगारून देत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अभंगरचना करण्याबरोबर भजन, कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृती केली. मध्ययुगीन काळात कर्मकांडाने स्त्रियांवर अनेक बंधने लादलेले असतानादेखील त्यांनी समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करणे ही साधी बाब नाही. यावरूनच त्यांच्या सामाजिक कार्याची व्याप्ती दिसून येते.

**संत ज्ञानेश्वर**

संत ज्ञानेश्वर मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासातील एक श्रेष्ठ युगपुरुष होते. त्यांच्या सामाजिक कार्याची ओळख अक्षय वाड्.मयातून प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. ‘हे विश्वची माझे घर’ ही वृत्ती अंगी असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे कार्यही लोकोत्तर होत गेले. त्यांनी अज्ञ समाजाला ज्ञानी करणे, निद्रिस्ताला जागे करणे, आत्मबोध करणे, खया  ज्ञानापासून वंचित असलेल्या समाजाला, स्त्री-शूद्रांना भक्तीच्या वाटेवर आणणे, प्रेमाने त्याला सामावून घेऊन, त्यांचा सांभाळ करून त्याला मुक्ती मार्गदर्शन करण्याचे महान कार्य केले. लोकोद्धारासाठी झटणे हीसुद्धा भक्तीच आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

**संतकृपा झाली। इमारत फळा आली।।**
**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिलें देवालया।।**
**नामा तयाचा किंकर। तेणें रचिलें ते आवार।।**
**जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत।।**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**
**बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केले वोजा।।**

सदर अभंग हा वारकरी संप्रदायातील विविध संतांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून देणारा आहे. बहिणाबाई ‘ज्ञानदेवे रचिला पाया’ असे म्हणते. ज्ञानेश्वरांनी केवळ भागवत धर्माचा पाया रचला एवढेच नसून त्यांनी मानवजातीच्या ह्रास पावलेल्या मूल्यांचीही पायाभरणी केली आहे. त्यांच्या कार्याचे सामाजिक, पारमार्थिक, आध्यात्मिक, वाड्.मयीन, सांप्रदायिक इत्यादी विविध पैलू आहेत. याबाबतीत गं.बा.सरदार म्हणतात की, ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आद्य प्रणेते होते. चक्रधरप्रभुती महानुभाव आचार्यांनी जरी हे कार्य त्यांच्या आधी हाती घेतले असले, तरी त्यांना अपेक्षित यश आलेले नव्हते. ज्ञानेश्वरांनी आपल्या संजीवन साहित्याने आणि त्यातील ललितरम्य व स्निग्ध मधुर शैलीने हजारो लोकांची मने वेधून घेतली. त्यांचे अध्यात्मनिरूपण हे सर्वांसाठी असले, तरी त्यामुळे समाजातील दीन दलितांचे सामाजिक आत्मभान जागृत झाले. सर्व मानवजातीच्या कल्याणाकरिता

तळमळणाया ज्ञानेश्वरांना सगळयांनी 'माऊली' असे संबोधले, यातच त्यांच्या लोकोत्तर सामाजिक कार्याची व्यापकता दिसून येते. 'विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो' म्हणणारे संत ज्ञानेश्वर विश्वातील दीन-दलितांचे, अज्ञानी, भोळया-भाबड्याचे ज्ञानसूर्यच होते.

**संत चोखामेळा**

नामदेवांच्या संत प्रभावळीतील एक महत्त्वपूर्ण संत म्हणजे चोखामेळा 'चोखोबा' या नावानेही ते ओळखले जात. मंगळवेढ्याचा रहिवासी असलेला आणि जातीने महार असलेला हा संत विठ्ठलाचा निःस्सीम भक्त म्हणून प्रसिद्ध पावला. १३ व्या शतकात गावगाड्याची प्रथा रूढ झाली होती. म्हणजेच, एका गावात दोन गावांची रचना झालेली होती. वेशीच्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या वर्णाची घरे स्वतंत्र होती. तर वरील तिन्ही समाजांचे सर्व कामे पार पाडणारे बारा बलुतेदार किंवा कनिष्ठ जातींच्या लोकांची घरे गावकुसाबाहेर पूर्वेला वसलेली होती. गावकुसाबाहेरील कनिष्ठ किंवा अस्पृश्य वर्गाला अतिशय हीन वागणूक दिली जात होती. ही परंपरा वैदिक काळापासून चालत आलेली होती. वतनदार, कुलकर्णी, पाटील यांच्याकडून गावचा कारभार केला जात होता. यासंदर्भात संत चोखामेळा आपल्या 'जोहार' या अभंगामध्ये गावगाड्यांचे वर्णन करताना म्हणतात की,

**कोपटी तळपती गाई। हाडाची बेडी पडेल पायी।**
**तोंड चुकविता इज्जत जाई। मग वाचोनिया काय की जे मायबाप।।**
**जोहार पाटील बाजी। चावडी चलना की जी।।**
**ऐसे सांगत आलो आजी। बहुत बाकी थकली की मायबाप।।**
**हिमायत येथे न चाले काही। वार्ता पुढे भाई।**
**वरते पाय खाली डोई। नव महिने होईल की मायबाप।।**
**उगली का कोंडीता गुरे। गांविची का बुजविता द्वारे।**
**फेडा झाला बरोबर नका उणे पुरे की मायबाप।।**
**यंदा आली देवाची पाळी। तोंडे काजी करिता काळी।**
**चावडी चला या वेळी। शिव्यागाळी घेऊ नका की मायबाप।।**
**कुलकर्णी आपल्या स्वाधीन करा। आडखर्चाचा ताळा धरा।**
**दयाळु मयाळु बाप करा। येईल मुजरा निजसत्वे की मायबाप।**
**विठू पाटलांचा महार। चोखा मेळयाचा जोहार।**
**सकळ संताचा कारभार। मज नफराचे शिरीकीजे मायबाप।।**

चोखामेळा यांनी वरील अभंगामध्ये तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे उत्कृष्ट वर्णन केले आहे. त्यांच्या बहुतेक अभंगांतून दलितांवर होणाया सामाजिक अन्यायाची बोच व्यक्त झाली आहे. शूद्र जातीत जन्माला आल्यामुळे जीवन जगताना जे अनुभव त्यांच्या वाट्याला आले, ते अनुभव शब्दबद्ध करताना त्यांनी शूद्र जातीत जन्माला आल्याची वेदना प्रकट केली आहे. अशा कठीण परिस्थितीत जीवन जगत असताना मायबाप विठ्ठलाने आपल्यावर कृपा करावी, हा भाव ते व्यक्त करतात.

**हीन याति माझी देवा। कैसे घडे तुझी सेवा।।**
**मज दूर-दूर हो म्हणती। तुज भेटू कवण्या रिती ।।**
**यातिहीन आम्हा कोण अधिकार। अवघे दूर-दूर करिताती।।**
**चोखा म्हणे ऐसा हीन नरदेह। पडिला संदेह काय करू।।**

सदर अभंगातून चोखोबांनी पद्दलित जातींना दिली जाणारी वागणूक याविषयी मत व्यक्त केले आहे. तत्कालीन समाजात असलेल्या विषमतेची तीव्रता त्यांच्या अभंगात प्रामुख्याने दिसून येते. थोडक्यात, वारकरी संप्रदायातील पहिला 'दलित संत कवी' म्हणून संत चोखामेळा यांची ओळख आहे.

संत चोखामेळा यांनी अभंगाच्या माध्यमातून जातीयता, अस्पृश्यता आणि वर्णव्यवस्था यावर ताशेरे ओढले आहेत. तत्कालीन समाजजीवनाचे वास्तव दर्शन त्यांच्या अभंगातून जागोजागी घडते.

**संत एकनाथ**

१६ व्या शतकात एकनाथांनी 'चतु:श्लोकी भागवत','एकनाथी भागवत','भावर्थ रामायण','रूक्मिणी स्वयंवर','काही आध्यात्मिक प्रकरणे','भक्तिचरित्रे अशी वाड्.मय रचना केली आहे. संत एकनाथकालीन परिस्थितीत समाजामध्ये दारिद्रय, दैन्य, अज्ञान आणि विषमता यांनी धुमाकूळ घातला होता. तर दुसरीकडे, परकीय आक्रमणाने महाराष्ट्राची धर्म, संस्कृती आणि भाषा लोप पावत चालली होती. या सर्व परिस्थितीला तत्कालीन सनातन धर्मच कारणीभूत होता. त्यामुळे समाजात जनजागृती करण्याचे महान कार्य संत एकनाथांनी केले. याविषयी ल.रा.नसिराबादकर म्हणतात की, ''मतभिन्न व वर्णभिन्न परिस्थितीत उच्च धार्मिक जीवनाची मूलभूत तत्त्वे समाजाला समजतील व पचतील अशा सोप्या भाषेत सांगणाया भक्तिमार्गाचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक होते, आणि ते पुनरुज्जीवन जनार्दन स्वामीच्या आज्ञेमुळे नाथांकडून झाले.'' संत एकनाथानी हिंदू धर्माने खचून न जाता पराभूत मानसिकतेतून बाहेर पडून परिवर्तन घडविणे आवश्यक असल्याचे सांगितले. 'भारूड' हे समाजप्रबोधनाचे उत्तम साधन असल्यामुळे त्यांनी हिंदू आणि मुस्लीम यांच्यात राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित होण्यासाठी अनेक भारुडांची निर्मिती केली. कर्मठ सनातनी व्यवस्थेने निर्माण केलेली मतभिन्नता आणि वर्णभिन्नता यामुळे सर्वसामान्य लोकांची पिळवणूक होत होती. ही परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी समाजप्रबोधनाच्या माध्यमातून आत्मीयतेने सामाजिक कार्य केले. एकूणच, संत एकनाथांनी वारकरी संप्रदायाला भारुडाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले 'एकनाथी भागवत', 'चतु:श्लोकी भागवत','भावार्थ रामायण','रूक्मिणीस्वयंवर' यासारख्या ग्रंथांची निर्मिती केली. त्यांच्या या ग्रंथातून व अभंगांतून तत्कालीन काळानुरूप सामाजिक विचार काही प्रमाणात व्यक्त झाले आहेत.

**संत सावता माळी**

आपल्या व्यवसायात विठ्ठल पाहणारा आणि सारे जीवन विठ्ठलमय करून टाकणारा कर्मयोगी संत सावता माळी हे तेराव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण संत आहे. संत सावता माळी यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे विवेचन करताना म्हटले आहे की,

**भली केली हीन याती। नाही वाढली महंती।।**
**जरी असता ब्राह्मण जन्म। तरी हे अंगी लागते कर्म।।**
**स्नान नाही संध्या नाही। याति कुळ संबंध नाही।।**
**सावता म्हणे हीन याती। कृपा करावी श्रीपती।।३१**

संत सावता माळी यांनी कर्मठ सनातनी व्यवस्थेब÷लचे विवेचन वरील अभंगामध्ये केले आहे. ते म्हणतात की, सामाजिकदृष्ट्या आपण खालच्या स्तरात जन्मलो, बरे झाले. हीन मातीत जन्माला आल्याचा विषाद वाटण्याऐवजी सावतांना आनंदच वाटतो. तरी ते स्वतःला या स्तरात जन्म घेतला म्हणून, भाग्यवान मानतात. कारण, उच्च वर्णात जन्म झाला असता तर अहंकारी वृत्ती बळावली असती. त्यामुळे माझ्याकडून सर्वसामान्याची सेवा झाली नसती. यावरून संत सावता माळी यांनी वरिष्ठ जातींना कर्म पटत नव्हते. त्याला त्यांनी विरोध केलेला दिसून येतो.

**सारांशः**

एकंदरीत, संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची पायाभरणी केली असली तरी वारकरी संप्रदायाची परंपरा ही ज्ञानेश्वरांच्या अगोदरपासूनच चालत आलेली होती. कारण, संत ज्ञानेश्वरांचे कुटुंबच विठ्ठलभक्तीने भारावून गेले होते. भक्त पुंडलिकांच्या सेवेला प्रसन्न होऊन विठ्ठल पंढरपुरात विटेवर उभा राहिला. तो आजही तसाच आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायात भक्त पुंडलिकाला मानाचे स्था-

न आहे. भक्त पुंडलिकांचा कार्यकाल हा सर्वसाधारणपणे संत ज्ञानेश्वरपूर्व ५०० वर्षांचा समजला जातो. यावरून विठ्ठलभक्तीचे प्राचीनत्व लक्षात येते. ज्ञानेश्वरांनी भक्तीला तत्त्वज्ञानाची जोड देऊन वारकरी संप्रदायाचा पाया भक्कम केला. त्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. संत ज्ञानेश्वरान्तर संत नामदेवांनी भक्ती महिमा 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' यानुसार वारकरी संप्रदायाचा विस्तार कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरसुद्धा केला. त्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायाचे प्रचारक, संघटक आणि आद्यप्रवर्तक मानले जाते. नामदेवांच्या नंतर वारकरी संप्रदायाची कावड निवृत्तीनाथ, सोपानदेव, विसोबा खेचर, गोरोबा कुंभार, परिसा भागवत, सावता माळी, चोखा मेळा, बंका महार, सेना न्हावी, नरहरी सोनार, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मळा, भागू अशी संतांची व संत कवयित्रींची महाराष्ट्रात मांदियाळी उदयास आली. या सर्व संतांनी समाजजागृती करीत असताना श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, स्त्री-पुरुष असा कोणताही भेदा-भेद न करता सर्व समाजाला मानवतावाद, समता, बंधुत्व या मानवी मूल्यांचे शिक्षण दिले. संत ज्ञानेश्वरांच्या सर्वसमावेशक दृष्टीमुळे या संप्रदायामध्ये अठरापगड जातींचे संत उदयास आलेले दिसून येतात.

**संदर्भ सूची**

१. कुलकर्णी पी.के., सामाजिक विचार प्रवाह, मंगेश प्रकाशन, नागपूर,
२. डॉ.बी.एल.फडिया, राजनीति विज्ञान, प्रकाशन प्रतियोगिता साहित्य सीरीज, आगरा,
३. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर सहावी आवृत्ती,
४. सरदार गं.बा., ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा, कौशिक व्याख्यानमाला अंक, स.प.महाविद्यालय, पुणे, १९७१
५. डॉ. दातार मुकुंद, वारकरी संप्रदायाची प्रस्थापत्रयी, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००८
६. डॉ.इर्लेकर सुहासिनी, प्राचीन राठी संत कवयित्रींचे वाड्.मयीन कार्य, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८०
७. कदम स.भा., संत चोखामेळा, चरित्र अभंग, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वितीय आवृत्ती, मार्च १९९८,
८. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती १९९४
९. तुळपुळे शं.गो., लीळाचरित्र उत्तरार्ध भाग-१ व २, सुविचार प्रकाशन, नागपूर, १९६७
१०. देशपांडे ब्रह्मानंद, लीळाचरित्र एकांक, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९०